# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/10/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## भिवापूर येथील वृद्ध इसमाच्या खुनाचा उलगडा

## आरोपी स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा. च्या जाळयात

पोस्टे भिवापूर अंतर्गत ०७ कि. मी अंतरावर मौजा सावरगाव (नेरी) पुनर्वसन गोंडबोरी शिवार येथे दिनांक १२/१०/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक १३/१०/२०२३ चे ११.४७ वा. पुर्वी यातील **मृतक नामे— सुर्यभान तानबाजी वानखेडे, वय ७५ वर्षे, रा. सालेशहरी पुनर्वसन ता. भिवापूर जि. नागपूर** हे दिनांक १२/१०/२०२३ रोजी १२:०० वा. दरम्यान भिवापूर येथे जातो म्हणुन घरून निघुन गेले असता रात्री उशीरा पर्यंत घरी परत न आल्याने कांता वानखेडे हिचे तक्रारी वरून पो.स्टे. ला मिसींग क्र. २४/२३ प्रमाणे दाखल करण्यात आली. सदर मिसींग चौकशी दरम्यान दिनांक १३/१०/२०२३ चे ११:४७ वा. दरम्यान यांतील मिसींग इसम सुर्यभान तानबाजी वानखेडे हे मृत अवस्थेत मौजा सावरगाव (नेरी) पुनर्वसन गोंडबोरी शिवारात मिळुन आल्याने मृतक यास कोणीतरी अज्ञात आरोपीने जिवानीशी ठार केले. यावरून फिर्यादी प्रदिप सुर्यभान वानखेडे यांचे तोंडी रीपोर्ट वरून पोस्टे भिवापूर येथे अप क्र. ४४४/२३ कलम ३०२ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक यांनी समांतर तपासाची सुरूवात करून आरोपीचा शोध घेत होते. आज दिनांक १४/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे भिवापूर हद्दीत समांतर तपास करीत असतांना मिळालेल्या गोपनीय खबरेवरून इसम नामे दिलीप रतीराम चिरके, वय २९ वर्ष, रा. सालेभट्टी पुनर्वसन ता. भिवापूर जि. नागपूर यास ताब्यात घेतले. सदर घटनेच्या अनुशंगाने त्यास विचारपुस केली असता त्याने नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यास अधिक विचारपुस केली असता आरोपीने सांगितले की, काही वर्षापुर्वी आरोपीचे वडीलाने मृतक इसमाकडून व्याजाने पैसे घेतले होते. ते पैसे मृतक इसम परत घेण्यासाठी आरोपी इसमाच्या वडीलांना दमदाटी करायचा या जुन्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपीने मृतक इसमाचा खुन केल्याचे सांगितले

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. राजा पवार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे, पोहवा अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, मयुर ढेकळे, राजू रेवतकर, आशिष भुरे, पोशि राकेश तालेवार, सायबर सेलचे सतिश राठोड, महिला पोलीस नायक वनिता शेंडे, चालक अमोल कुथे, आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे, यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर